**||श्रीपादश्रीवल्लभ प्रसन्न ||**

**प्रास्ताविक** - कोकणांतील रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर या तालुक्यातील नवजीवन विकास सेवा संस्थेने अल्पावधीतच संपूर्ण महाराष्ट्रात नांव कमावले आहे. गोवंशसंवर्धन आणि शेती यांसह शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या या संस्थेने प्रेरणा देत " नवजीवन एग्रो सपोर्ट सर्व्हीसेस & कन्सल्टन्सी " ही फर्म सुरू केली. या माध्यमातून संस्था विवीध व्यावसायीक सेवा देते. या सेवा शेती, शिक्षण व गोवंशसंवर्धन या क्षेत्राशी निगडीत असतात. मान्यवर तज्ज्ञ व स्वतःचा अनुभव यांची सांगड घालत ही फर्म वाटचाल करीत आहे.

# आमचे उद्दीष्ट व ध्येय

**विविध शेतीविषयक सेवा व विश्वसनीय व्यवहार करीत ग्राहकांना ज्ञान व माहिती यांची सेवा देत वस्तू, सल्ला, कृषी निवीष्ठा, चल वा अचल वस्तूंचा पुरवठा हेच आमचे ध्येय व समाधानी ग्राहक हेच उद्दीष्ट.**

# नवजीवन व गोवंशसंवर्धन.

गुजरात राज्यातील " गीर " या प्रजातीची गाय अवघ्या जगाला आवडणारी भारतीय जात आहे. " मदर इंडिया & फादर ब्राझील " या पुस्तकात आपणाला याचे दाखले वाचायला मिळतात. आमच्या संस्थेच्या मार्फत व फर्मच्या माध्यमातून आजवर या गाईच्या संदर्भात आम्ही जागृती केली आहे. महाराष्ट्रात तरी प्रथम आम्ही " गीर गाय कार्याशाळा " या नावाने एक दिवशीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले. संपूर्ण महाराष्ट्रातून या वर्गाला २४३ गोपालकांनी उपस्थिती दर्शविली होती. या नंतर फलटण ( जि. सातारा ), कासार्डे ( जि. सिंधुदुर्ग ) आष्टी ( जि. जालना ) नारायणगाव व पुणे ( जि. पुणे ) या स्थळांवर संस्थेने कार्यशाळा घेतल्या. अवघ्या वर्षभरातच संस्थेचे " गोदान डॉट इन " हे संकेतस्थळ तयार होऊन ते गोपालकांच्या पसंतीला उतरले. राज्यातील मान्यवर गोपालक व पशूतज्ज्ञ व अभ्यासक यांचेसह केशवसृष्टी गोशाळाचे अध्यक्ष श्री. राजीव आपटे यांच्या प्रमुख उपस्थीतीत व लातूर येथील संस्थेला गोदान करणारे श्री. रामनिवास लक्ष्मीनिवास अग्रवाल ( हनुमान खांडसरी शुगरमील हलगरा ) यांच्या शुभहस्ते झाले. यानंतर २०११ साली लांजा या गावी रत्नागिरी येथे १६ व १७ मे रोजी राज्यस्तरीय गोवंशप्रेमी ग्रामविकास संमेलन श्री. पोपटराव पवार ( सरपंच हिवरेगाव बाझार) व श्री. सुनीलजी मानसिंहका ( गोवंश अनुसंधान केंद्र नागपूर ) यांच्या उपस्थीतीत १८४३ गोपालकांच्या सहभागाने संपन्न झाले.

# प्रशिक्षण व नवजीवन संस्था व गीर गाय उपलब्धता.

आमच्या नवजीवन विकास सेवा संस्थेने विविध प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या. नारायणगाव पुणे येथील राज्यस्तरीय ए.टू दूध कार्यशाळा व महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागासह " आत्मा " उपक्रमातील प्रशिक्षणासह संस्थेने नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राच्या संयुक्त विद्यमाने गोपालकांना प्रशिक्षण दिले. या सर्व वाटचालीत कायमच गोपालकांचा प्रश्न राहीला तो म्हणजे गीर गाय उपलब्धतेचा. अखेर आमच्या संस्थेच्या माध्यमातून आम्ही २३ गीर गाई गोपालकांना सशुल्क उपलब्ध करून दिल्या. प्रशिक्षण घेतल्यावर व दिल्यावर एक अपरिहार्य बाब म्हणजे पुरवठा. काही तांत्रीक कारणांमुळे व अडचणींमुळे सुरूवातीला संस्था हे काम करीत नव्हती. मात्र आता आपल्या फर्मच्या माध्यमातून आपण या गोसेवेच्या माध्यमात कार्यरत आहोत.

# पुरवठा करणार नांव व पत्ता

नवजीवन सपोर्ट सर्व्हीसेस & कन्सल्टन्सी.

मु.पो. रायपाटण ( बागवाडी ) ता. राजापूर. जि. रत्नागिरी. पीन. ४१६७०४.

इ.मेल. info@nvssindia.com Website – www.godan.in

Mobile – 9420055268 or 9222728309.

# गीर गाईंची खरेदी व विक्री

आमची फर्म अनुभवी व आमच्या तज्ज्ञ गोपालकांकरवी गीर जातीच्या गाई गुजरात, राजस्थान, हरियाणा, मध्य प्रदेश या राज्यातून खरेदी करते. आम्ही खरेदी केलेल्या गाई आमच्या गोशाळेत आणून त्यांची विविध प्रकारची खात्री करून घेऊन आमच्याकडे नोंदणी केलेल्या ग्राहकांना पुरवल्या जातात. खरेदी केलेली गाय विवीध प्रकारच्या चाचण्यांतून व तपासणीतून पार होऊनच ग्राहकांपर्यंत दिली जाते.

## गाईची किंमत, दुग्धोत्पादन क्षमता, व शुद्ध वंशाबाबत.

निवड केलेल्या गाई किमान  रू. ४५,०००/- ( अक्षरी रू. पंचेचाळीस हजार मात्र ) ते कमाल २,५०,०००/- ( अक्षरी रू. दोन लाख पन्नास हजार मात्र ) किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेच्या असू शकतात. दुग्धोत्पादन क्षमता १० ते २५ लि. किंवा २६० ते २७० दिवसाला ३००० ते ४००० लि. आम्ही ग्राहकाच्या मागणीनुसार व त्याच्या हेतूनुसार गाईची निवड करतो. शुद्ध अनुवंशाची गाय तिच्या दुग्धोत्पादनापेक्षा शुद्ध अनुवंशासाठी जास्त प्रसिद्ध असते. गाईची किंमत वेगवेगळ्या संदर्भात बदलते. ( आम्ही आवश्यकतेनुसार आमच्या ग्राहकांना तपशील, फोटो, व्हॉटस अप, बेबसाईट, फेसबुक आदी माध्यमातून  पुरवतो. )

## गाईंचे वय, वजन, उंची. वेत, रंग इत्यादी.

आम्ही खरेदी केलेली गाय दुस-या ते तिस-या वेताची असते. वय कमीत कमी ३६ महिने ते ४ वा ५ वर्षे वयाची असते. वजन कमीत कमी ३५० किग्रॅ ते जास्तीत ७०० किग्रॅ. वा बांधा व उंचीनुसार चार्टप्रमाणे. गाईची उंची कमीत कमी ४.५ फूट व जास्तीत सहा फूट  लांबी शिंगे ते शेपूट ५ फूट ते ६.५ फूट. रंग लाल किंवा काबरा वर्ण. ( गीर वंश ५६ उपप्रकारात विभागला गेलेला आहे. ) ग्राहकाने मागणी केल्यानुसार आम्ही निवड करतो.

## गाईंची तपासणी व आरोग्य दाखला.

गाईची आरोग्य तपासणी खरेदीवेळी संबधित गावातून केली जाते. तसेच आमच्या गोशाळेत आणल्यावर आमचे पशूवैद्यक संबधित गाईची विविध निकषांनुसार तपासणी करतात. तशाप्रकारचा दाखला तयार केला जातो. शासनाच्या वर्ग १ पशूवैद्यकाकडील दाखलाही घेतला जातो. लसीकरण, जंतनाशक औषध, आदी सर्व बाबींची पूर्तता केली जाते. हे सर्व दाखले ग्राहकाला दिले जातात.

## गाईंच्या संदर्भात व फीटनेसबाबत,

गाईंच्या बाबतीत फीटनेस प्रमाणपत्र दिले जाते. रक्त, लघवी तपासणी या मान्यवर व शासनमान्य प्रयोगशाळेतून करूनच ग्राहकाकाच्या गाय ताब्यात दिली जाते.

# ऑर्डर व पुरवठा कालावधी

ग्राहकाने खरेदीची ऑर्डर दिल्यापासून ४५ दिवसात गाय ताब्यात दिली जाते. या संदर्भात काही तपशील परिस्थितीनुसार बदलला जातो. गाय व्यालेल्या दिवसापासून २१ दिवस दूध वाढण्यासाठी फार महत्त्वाचे व संदर्भाचे असतात. विविध चाचण्या व तपासणी होईतोवर हा कालावधी लागतोच. ग्राहकाची कोणतीही तक्रार व तशा प्रकारचा आग्रह नसल्यास या वेळेत व वेळापत्रकात बदल केला जाऊ शकतो. तशा प्रकारचे पत्र ग्राहकाकडून आवश्यक राहते.

# आर्थिक तपशील व रक्कम भरण्याबाबत.

ग्राहकाला ठरलेली वा व्यवहाराची रक्कम पूर्ण भरावी लागेल. रक्कम पूर्ण न केल्यास ऑर्डर तोंडी वा लेखी घेतली जाणार नाही. ग्राहकाला शासनाच्या नियमाचे व करांचे पालन केलेली पावती दिली जाईल. सर्व रक्कम चेकनेच वा डी.डी.ने किंवा रोख रक्कम खात्यावरती भरून घेऊन पावती दिली जाईल.

# आमच्या इतर अटी व तपशील

आम्ही आमच्या ग्राहकांचे जास्तीत समाधान व त्यांना आनंद मिळावा म्हणून कसोशीने प्रयत्न करीत असणार आहोत. मात्र तरीही कोणतीही उणीव राहता कामा नये यासाठी आमच्या खालील अटींचे पालन करू शकेल अशा ग्राहकाशी व्यवहार केला जाई. कृपया याची दखल घ्यावी ही विनंती.

१) गोपालकाला किंवा ग्राहकाला खरेदी केलेली गाय आमच्या गोशाळेतूनच न्यावी लागेल. प्रवासातच किंवा अर्ध्या वाटेवरूनच गाय दिली जाणार नाही.

२) गोपालकाला आमच्या गोशाळेत येऊन दूधाची व गोधनाची खात्री समक्ष जागेवर येऊन स्वतः वा आपल्या विश्वासू प्रतीनिधीमार्फत करावी लागेल. तशाप्रकारचे नाहरकत पत्र आमच्या फर्मला द्यावे लागेल.

३) गोपालकाला किंवा त्याच्या प्रतिनिधीला आमच्या गोशाळेत येऊन कमीत कमी चार वेळा व जास्तीत जास्त आठ वेळा दुग्धोत्पादनाची खात्री करून घेता येईल. या निवासाचे शुल्क द्यावे लागणार नाही. भोजन व्यवस्था माफक दराने केली जाईल. या नियमात व अटीत आवश्यकतेनुसार व व्यक्तीगणिक प्रसंगानुसार बदल केला जाईल.

४) एकदा दिलेली ऑर्डर कोणत्याही कारणास्तव वा कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. तशाच प्रकारचे कारण घडल्यास संबधित गोधन दुस-या ग्राहकाला विक्री होईस्तोवर ऑर्डर रद्द करीत असलेल्या प्रतिक्षा करावी लागेल.

५) गाय खरेदी करीत असलेल्या ग्राहकाला स्वतः दूध काढता येणे वा माहिती असणे अपेक्षित आहे. मात्र तशे नसेल तर त्याच्या प्रतिनीधीला वा मजूराला ही माहिती असमे आवश्यक आहे.

६) आवश्यकतेनुसार गोपालन प्रशिक्षण देण्याची व्यवस्था सशुल्क केली जाईल. हे प्रशिक्षण कमीत कमी एक दिवस ते जास्तीत जास्त पाच दिवसांचे सशुल्क दिले जाईल.

७) गाय खरेदी केल्यानंतर आवश्यकतेनुसार संबधित गाईची छायाचित्रे ग्राहकाला पाठविली जातील.

८) गाय खरेदी केल्यानंतर व ताब्यात घेतल्यावर तसेच आमच्या गोशाळेतून गोशाळेबाहेर नेल्यावर आमची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

९) खरेदी केलेल्या गाईसाठी आवश्यकतेनुसार विविध सेवा पुरविल्या जातील. मात्र त्या घेणे ग्राहकावर बंधनकारक नसेल.

१०) आमच्या संस्थेमार्फत विविध संदर्भ साहित्य व गोशाळेबाबतचा तपशील किंवा गोशाळेसाठीचा प्रकल्प अहवाल, गोशाळा, दुग्धव्यवसाय आदीबाबत प्रकल्प अहवाल सशुल्क करून दिले जातील. याबाबत परस्पर संपर्क व संवाद करून निर्णय घेतले जातील.

।। शुभं भवतु.।।